


चेन्नईचा ८३ धावांनी विजयी

पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

www.dainikherald.com

# दैनिक हेराल्ड



चेन्नईचा ८३ धावांनी विजयी

पान ३ वर

वेर्णा, सोमवार, २६ मे २०२५ I पाने ४ I ₹ ४

I REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 I Volume 13, Issue 263 I Verna, I facebook.com/dainikherald I Monday 26 May 2025 I Pages 4 I ₹ 4

## निवडक

### बिहारच्या राजकारणात भूकंप

**पाटणा, दि. २५ :** राष्ट्रीय जनता दलाचे (राजद) प्रमुख लालू प्रसाद यादव यांनी आपले ज्येष्ठ पुत्र तेजप्रताप यादव यांना आपल्या पक्षातून निलंबित केले आहे. तेजप्रताप यांना ६ वर्षांसाठी पक्षातून निलंबित करण्यात आले आहे. खुद्द लालू प्रसाद यांनी या वृत्तीची माहिती दिली आहे. लालू प्रसाद यादव यांनी ट्विट करत याबाबत माहिती दिली आहे. तेजप्रताप यादव हे त्यांच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आले आहेत. तेजप्रताप यादव यांनी सोशल मीडियावर एका मुलीसोबत पोस्ट शेअर केली होती. त्यांनी पोस्टमध्ये आपल्या रिलेशनशिपबाबत भाष्य केले होते. त्यामुळे ते चर्चेत आले आहेत. विशेष म्हणजे बिहार निवडणूक तोंडावर आहे. अशा परिस्थितीत तेजप्रताप यादव यांची पोस्ट ही बिहारच्या राजकारणात वादळ निर्माण करु शकते. तेजप्रताप यादव यांच्या पोस्टनंतर त्यांच्या वडिलांनी तातडीने मोठी कारवाई केली आहे. त्यांनी आपल्या मुलाला पक्षातून निलंबित केले आहे. खाजगी जीवनातील नैतिक मूल्यांचे उल्लंघन करणे हे सामाजिक न्यायासाठीच्या आपल्या सामूहिक संघर्षाला कमजोर करते. ज्येष्ठ मुलाचे वर्तन, लोकांमध्ये वागण्याची पद्धत आणि बेजबाबदार व्यवहार हे आपल्या कौटुंबिक मूल्यांच्या आणि संस्कारांच्या विरोधात आहे.

------------------

### करोनाच्या ओमिक्रॉनचा नवीन प्रकार जेएन.१

**नवी दिल्ली, दि. २५ :** कोरोनाच्या ओमिक्रॉनचा नवीन प्रकार जेएन.१ च्या देशातील वाढत्या संसर्गाच्या पार्श्वभूमीवर दिल्ली, कर्नाटकसह अनेक राज्य सरकारांनी विशेष आरोग्य दिशानिर्देश जारी केले आहेत. सर्व रुग्णालयांना बेड, ऑक्सिजन, औषधे आणि लसींचा पूर्ण पुरवठा ठेवण्यास सांगण्यात आले आहे. केंद्रीय आरोग्य विभाग राज्यांशी नियमित संपर्कात असून कोरोना रुग्णसंख्येबाबत दिल्लीला दैनंदिन अहवाल पाठविण्याची सूचना करण्यात आली आहे.

यावेळी रुग्णांमध्ये आढळत असलेला ओमिक्रॉनचा जेएन.१ हा नवीन प्रकार आणि एलएफ ७ आणि एनबी १.८ हे त्याचे उप-प्रकार आढळू लागले आहेत. आरोग्य मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार कोवीडचे हे नवीन प्रकार पूर्वीपेक्षा जास्त धोकादायक आहेत किंवा वेगाने पसरत आहेत असा पुरावा अद्याप मिळालेला नाही. मात्र त्यांचा परिणाम कमकुवत प्रतिकारशक्ती असलेल्या लोकांवर होऊ शकतो असा इशारा देण्यात आला आहे. दिल्लीतील तसेच आसपासच्या नोएडा, गुरुग्राम, गाझियाबाद, फरीदाबाद या शहरांतील कोरोना रुग्णसंख्याही वाढत चालली आहे. दिल्लीच्या सर्व रुग्णालयांना प्रत्येक पॉझिटिव्ह कोविड नमुना जीनोम सिक्वेन्सिंगसाठी लोक नायक रुग्णालयात पाठवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

------------------

### ट्रम्प यांचा मनमानी कारभार सुरूच

**वॉशिंग्टन, दि. २५ :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जागतिक महासत्तेची सूत्रे हाती घेतल्यापासून जगभरातील देशांना धडकी भरवली आहे. आपल्या टॅरिफबाबत निर्णयापासून ट्रम्प यांचा मनमानी कारभार सुरूच आहे. अलीकडेच ट्रम्प यांनी One Big, Beautiful Bill' सादर केले ज्यामध्ये काही फायद्याच्या तर काही विवादित तरतुदी केल्या आहेत. यापैकी आता अमेरिकेत जन्मलेल्या मुलांना १००० डॉलर्स (सुमारे ८५ हजार रुपये) दिले जातील. डोनाल्ड ट्रम्प नवीन कर विधेयकात याबद्दल बोलले. त्याचवेळी, अमेरिकन हाऊस रिपब्लिकननी ट्रम्प यांच्या टॅक्स विधेयकात एक मोठा बदल केला आणि MG अकाउंट' चे नाव बदलून ट्रम्प अकाउंट केले. मुलांच्या या खात्यात एक हजार डॉलर्स जमा केले जातील. गेल्या आठवड्यात अमेरिकन सरकारने एक योजना आखली, ज्याला Wealth Creation Programme' असे नाव दिले. हा कार्यक्रम डोनाल्ड ट्रम्प राष्ट्राध्यक्ष असताना जन्मलेल्या मुलांसाठी होता. सरकारला मुलांसाठी वाढ आणि प्रगतीसाठी पैसे खाते' तयार करायचे होते. त्याला चक्रअकाउंट' असे म्हटले जायचे, जे आता ट्रम्प अकाउंट' असे ओळखले जाईल.

# आदिवासी कल्याण खाते काय कामाचे?

## मंत्री गोविंद गावडे यांचा मुख्यमंत्र्यांना थेट सवाल | प्रेरणा दिन गाजला

■ टीम दैनिक हेराल्ड :

**फोंडा, दि. २५ : राजधानीमध्ये प्रस्तावित असलेले 'आदिवासी भवन' हे राज्यातील आदिवासी समाजाच्या अस्मितेसाठी अनिवार्य असून त्या कामास सतत चालढकल करणे सहन केले जाणार नाही, असा तीव्र इशारा कला-संस्कृती मंत्री गोविंद गावडे यांनी रविवारी येथे दिला. आदिवासी भवनासाठी २०२६ पर्यंत प्रत्यक्ष बांधकाम सुरू झालेच पाहिजे; अन्यथा पुढील प्रेरणा दिन शासनाच्या मदतीशिवाय साजरा करायचा की नाही, याचा विचार करावा लागेल,असेही ते म्हणाले. इतकेच नाही तर कायद्यावर बोट ठेवून आदिवासी बांधांवर अन्याय करायचाच असेल तर आदिवासीच्या कल्याणाकरता असलेले आदिवासी कल्याण खातेच बंद करा असा तीव्र नाराजीचा सल्लाही गावडे यांनी दिला.**



आदिवासी कल्याण विभाग व उटा यांच्या संयुक्त विद्यमाने प्रेरणा दिन' कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या वेळी कृषी मंत्री रवी नाईक, एसटी-एससी आयोगाचे अध्यक्ष दीपक करमळकर, अनुसूचित जमात वित्तीय महामंडळाचे अध्यक्ष वासुदेव मंग गावकर, उटाचे अध्यक्ष प्रकाश वेळीप व इतर पदाधिकारी व्यासपीठावर उपस्थित होते.

मंत्री गावडे म्हणाले की, आदिवासी भवन हा आमचा हक्काचा प्रकल्प आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी उडवाउडवीची भूमिका घेणे थांबवून स्पष्ट कालबद्ध आराखडा सादर करावा. आज आदिवासी समाजाने फार्मागुडी येथे पंचवीस हजार बांधवांची एकजूट दाखवून आपली ताकद सिद्ध केली आहे. कार्यक्रमाच्या नियोजनातील त्रुटींकडे लक्ष वेधताना त्यांनी प्रशासनावर तीव्र शब्दांत टीका केली.

रवी नाईक यांनी, गोविंद गावडे यांनी मांडलेले मुद्दे सरकार गांभीर्याने घेईल. मुख्यमंत्री आणि संबंधित विभागांना या भावना पोचवण्यासाठी आम्ही संयुक्तपणे पाठपुरावा करू, असे आश्वासन दिले.

उटा अध्यक्ष प्रकाश वेळीप यांनी सरकारी प्रवासातील दिरंगाईवर नाराजी व्यक्त करत म्हटले की , आमच्या संघर्षामुळे इतर समाजांचाही फायदा झाला आहे. परंतु आदिवासी प्रश्नांवर कायमच कायद्याचे बहाणे पुढे केले जातात. सहनशक्तीचा अंत पाहू नका; आदिवासी कल्याण योजनांना निश्चित कालमर्यादा द्या. त्यांनी मुख्यमंत्र्यांकडे असलेले आदिवासी कल्याण खाते इतर मंत्र्याकडे सोपवण्याची सूचनाही मांडली, जेणेकरून समाजबांधवांना मंत्र्यांपर्यंत थेट पोहोचता येईल.

समारंभात आदिवासी प्रज्ञावंत पुरस्कार वितरण करण्यात आले. डॉ. अशोक प्रियोळकर (शिक्षण), सूरज दत्ता वेळीप (क्रीडा), मालू वेळीप (समाजकार्य) आणि सुशीला संतोष गावडे (कृषी) यांना गौरविण्यात आले. भविष्यात या पुरस्कारांसाठी नवी नियमावली आखणे गरजेचे असल्याचे मंत्री गावडे यांनी सूचित केले.

# मडगावमध्ये असुरक्षित इमारतींचा धोका गंभीर

टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २५ :** मडगाव शहरात सलग दोन दिवसांत झालेल्या अर्धवट इमारतींच्या कोसळण्याच्या घटनांनी नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण निर्माण केले असून, सार्वजनिक सुरक्षेच्या दृष्टीने याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

गांधी मार्केट परिसरात घडलेली पहिली दुर्घटना आणि त्यानंतर सिने लता थिएटर परिसरातील दुसरी घटना, या दोन्ही ठिकाणी कोसळलेल्या इमारतींच्या ढिगाऱ्याखाली वाहनांचे नुकसान झाले. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही, मात्र या घटनांनी जुन्या व जीर्ण इमारतींमुळे निर्माण होणाऱ्या संभाव्य धोक्यांची व्याप्ती समोर आणली आहे.

स्थानिक प्रशासनाने वारंवार दिलेल्या सूचनांकडे दुर्लक्ष झाल्याचा आरोप करत, नागरिकांनी मडगाव नगरपरिषद (एमएमसी) आणि जिल्हा प्रशासनाच्या भूमिकेवर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. जिल्हा प्रशासनाने यापूर्वीच एमएमसीला मडगावातील ओळखल्या गेलेल्या १९ असुरक्षित इमारतींवर तातडीने पाडकाम सुरू करण्याचे स्पष्ट आदेश दिले होते. मात्र प्रत्यक्षात, सार्वजनिक बांधकाम विभागाकडे विध्वंस पथक मागवण्याबाबत कागदोपत्री हालचाली वगळता कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही.

मडगावचे आमदार दिगंबर कामत यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले की, या इमारती खाजगी मालकीच्या आहेत. त्यामुळे त्या पाडण्याची जबाबदारी संबंधित मालकांची आहे.मात्र नागरिकांचा याला विरोध असून, सार्वजनिक सुरक्षेसारख्या गंभीर विषयावर फक्त खाजगी व्यक्तींच्या निर्णयावर अवलंबून राहणे धोकादायक ठरू शकते, असं त्यांचं म्हणणं आहे.

स्थानिक रहिवासी सेड्रिक फर्नांडिस यांनी भावना व्यक्त करत म्हटले , कोणीतरी जखमी झाल्यानंतरच सरकार हालचाल करणार का? या इमारती आधीच धोकादायक म्हणून घोषित करण्यात आल्या आहेत. प्रशासनाने आता केवळ इशारे न देता कृतीशील पावले उचलावीत.

गांधी मार्केट परिसरातील दुकानदार संदानंद नाईक यांनीही चिंता व्यक्त केली. दररोज आम्ही भीतीच्या सावटाखाली दुकाने उघडतो.

पान २ ▶

# गोव्यात मुसळधार पावसाचा इशारा

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २५ :** भारतीय हवामानशास्त्र विभागाने (आयएमडी) रविवारी गोव्यात नैऋत्य मोसमी पावसाचा अधिकृत प्रारंभ झाल्याची घोषणा केली आहे. विभागाने जारी केलेल्या अधिकृत बुलेटिननुसार, मान्सूनने पश्चिम-मध्य आणि पूर्व-मध्य अरबी समुद्राचा काही भाग, कर्नाटक व महाराष्ट्राचा काही भाग, संपूर्ण गोवा, तसेच मिझोराम, मणिपूर आणि नागालँडच्या काही भागांपर्यंत आपला विस्तार केला आहे.

आयएमडी ने पुढे सांगितले की, पुढील तीन दिवसांत मान्सून आणखी भागांत , मध्य अरबी समुद्र, मुंबईसह महाराष्ट्र, कर्नाटक (बंगळुरूसह), आंध्र प्रदेश, उर्वरित तामिळनाडू, बंगालच्या उपसागराचा पश्चिम-मध्य व उत्तर भाग आणि ईशान्येकडील राज्यांमध्ये सक्रिय होण्याची शक्यता आहे.

या पार्श्वभूमीवर हवामान विभागाने २९ मे २०२५ पर्यंत ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. २६ ते २९ मे दरम्यान गोव्यात अनेक भागांत मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.



आयएमडी च्या अंदाजानुसार, उत्तर आणि दक्षिण गोवा जिल्ह्यांतील काही भागांत ४० ते ६० किमी प्रतितास वेगाने वारे वाहतील आणि मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे.तसेच, ३० व ३१ मे रोजी हवामान विभागाने येलो अलर्ट' जारी करत दोन्ही जिल्ह्यांमध्ये काही भागांत मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. दरम्यान, सलग सहाव्या दिवशी रविवारी राज्यात मुसळधार पावसाने हजेरी लावली, ज्याचा परिणाम म्हणून अनेक भागांतील दैनंदिन जनजीवन विस्कळीत झाले.

१५ ते २१ मे २०२५ या कालावधीत संपलेल्या आठवड्यातउत्तर गोव्यात ६.६९ इंच पावसाची नोंद झाली जी अपेक्षित पर्जन्यमान ०.५७ इंचपेक्षा १०६९ टक्के अधिक आहे . तर दक्षिण गोव्यात याच कालावधीत ७.९३ इंच पाऊस पडला जो अपेक्षीत ०.५५ इंच पावसापेक्षा १३४१ टक्यांनी अधिक आहे.

दरम्यान १ मार्च २०२५ ते २५ मे २०२५ या कालावधीत म्हापसा १९.३४ इंच, पेडणे १६.६४ इंच, फोंडा १६.५३ इंच, पणजी १६.१० इंच, जुने गोवा १६.८१ इंच, साखळी १६.२ इंच, वाळपई १२.५ इंच , धारबांदोडा २१.९ इंच, काणकोण १३.२ इंच, दाबोळी २०.६ इंच, मडगाव २२.१ इंच, मुरगाव २० इंच, केपे १८.९ इंच आणि सांगे १६.८ इंच इटकी पावसाची नोंद झाली आहे.

मुसळधार पावसामुळे पेडणे तालुक्यातील तांबोसे गावात शानू तेली यांच्या घरावर झाड कोसळल्याची घटना घडली. अग्निशमन आणि आपत्कालीन सेवा अधिकारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन कर्मचाऱ्यांनी सागवानाचे झाड यशस्वीपणे हटवले असून कोणतीही मोठी जीवितहानी झालेली नाही.

# सत्यशोधन समितीचा ठपका देवस्थान समितीने नाकारला

■ टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. २५ :** शिरगाव येथे घडलेल्या चेंगराचेंगरीच्या दुर्दैवी दुर्घटनेसाठी श्री लईराई देवस्थान समिती जबाबदार नसून, प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे ही घटना घडल्याचा आरोप महाजनांनी ठेवला आहे. या पार्श्वभूमीवर रविवारी झालेल्या देवस्थानच्या सर्वसाधारण सभेत हा मुद्दा प्रमुखत्वाने उपस्थित करण्यात आला.

महाजनांच्या बैठकीत मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी एक लाख रुपये सानुग्रह मदत व जखमी भाविकांना २५ हजार रुपयांची मदत देण्याचा निर्णय घेण्यात आला. ही मदत देवस्थान समितीच्या माध्यमातून देण्यात येणार असल्याची माहिती अध्यक्ष दीनानाथ गावकर यांनी दिली.

या दुर्घटनेनंतर राज्य सरकारने नेमलेल्या सत्यशोधन समितीने सादर केलेल्या अहवालात या दुर्घटनेला देवस्थान समितीलाही जबाबदार धरण्यात आले आहे. मात्र, या आरोपांवर महाजनांनी तीव्र नाराजी व्यक्त करत ती जबाबदारी नाकारली आहे. समितीकडून अद्याप अधिकृतरित्या अहवाल प्राप्त झालेला नसल्याचे सांगत, तो मिळाल्यानंतरच पुढील भूमिका स्पष्ट करण्यात येईल, असे गावकर यांनी स्पष्ट केले.सभेच्या पार्श्वभूमीवर कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेता पोलिस बंदोबस्त वाढवण्यात आला होता. यावेळी प्रशासकीय अधिकारीही घटनास्थळी उपस्थित होते.

गावकर म्हणाले की, दुर्घटना अत्यंत दुर्दैवी होती. अशा घटना पुन्हा कुठेही घडू नयेत यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. देवस्थान समितीने सर्व आवश्यक तयारी केली होती. दुर्घटना घडलेली जागा हे मुख्य मंदिरापासून सुमारे एक किलोमीटर अंतरावर येते , आणि त्या ठिकाणी पोलिस उपस्थित नव्हते. त्यामुळे देवस्थानला जबाबदार ठरवणे अन्यायकारक आहे. ते पुढे म्हणाले की, सरकारने नियुक्त केलेल्या समितीने अहवाल तयार करताना अनेकांची मते घेतली असतील, मात्र त्यातून देवस्थान समितीवर जबाबदारी ढकलली जात असेल, तर तो अहवाल आम्हाला मान्य नाही.

या बैठकीत माजी अध्यक्षांनी केलेले आरोप फेटाळण्यात आले. तसेच गेल्या तीन वर्षांतील व्यवहारांची चौकशी सुरू असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली. बैठकीत पुढील जत्रोत्सवांसंदर्भात सरकारने जारी केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांना पाठिंबा दर्शवण्यात आला.

# भारत चौथ्या क्रमांकाची सर्वात मोठी अर्थव्यवस्था

## नीती आयोगाच्या दाव्यानंतर विरोधकांचा सरकारवर निशाणा

**नवी दिल्ली, दि. २५ :**

भारताने जागतिक स्तरावर मोठी आर्थिक झेप घेतली असून आता तो जगातील चौथ्या क्रमांकाची सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनला आहे. नीती आयोगाचे मुख्य कार्यकारी अधिकारी बी. व्ही. आर. सुब्रमण्यम यांनी यास दुजोरा दिला असून आंतरराष्ट्रीय नाणेनिधी च्या आकडेवारीचा हवाला देत ही माहिती दिली आहे.





नीती आयोगाच्या गव्हर्निंग कौन्सिलच्या दहाव्या बैठकीच्या पार्श्वभूमीवर आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना सुब्रमण्यम म्हणाले की, आपण सध्या ४ ट्रिलियन अमेरिकन डॉलर्सच्या पातळीवर पोहोचलो आहोत. मी बोलत असताना भारत चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था आहे. ही आकडेवारी माझी नाही, तर आंतरराष्ट्रीय नाणेनिधीची आहे.

ते पुढे म्हणाले की, भारताने जपानला मागे टाकले असून आता अमेरिका, चीन आणि जर्मनी एवढेच देश भारताच्या पुढे आहेत. आम्ही जर योजनेनुसार आणि सातत्याने प्रगती करत राहिलो, तर पुढील अडीच ते तीन वर्षांत भारत जगातील तिसऱ्या क्रमांकाची सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनेल.सुब्रमण्यम यांनी स्पष्ट केले की, भारत अशा टप्प्यावर आहे जिथे अनेक देशांनी पूर्वी जसा जलद विकास केला, तसा वाढीचा वेग आपणही साधू शकतो.

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने एप्रिल २०२५ मध्ये प्रसिद्ध केलेल्या 'जागतिक आर्थिक दृष्टिकोन' अहवालात , भारत २०२५ मध्ये ४.१९ ट्रिलियन अमेरिकन डॉलर्स इतक्या नाममात्र सकल देशांतर्गत उत्पादनासह (जीडीपी) जपानला मागे टाकून जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था ठरेल असे म्हटले होते.

आयएमएफ च्या अंदाजानुसार, आर्थिक वर्ष २०२५-२६ साठी भारताचा जीडीपी नाममात्र ४.१८७ ट्रिलियन डॉलर्सवर पोहोचेल, तर जपानचा जीडीपी थोड्याशा फरकाने कमी म्हणजेच ४.१८२ ट्रिलियन डॉलर्सवर राहील असे म्हटले आहे. असे असले तरी भारत दरडोई उत्पन्नात इतर देशांच्या तुलनेत अद्यापही पिछाडीवर आहे. दरम्यान, नीती आयोगाच्या सीईओंच्या या विधानावर काँग्रेसकडून प्रतिक्रिया उमटली आहे. काँग्रेसचे प्रवक्ते पवन खेरा यांनी सरकारवर टीका करत म्हटले आहे की , केवळ आकडेवारी दाखवून काही होत नाही.

पान २ ▶

